# विद्यापीठ अंतिम वर्ष परीक्षा आजपासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना व नैसर्गिक आपत्तीमुळे पुढे गेलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षा अखेर मंगळवार (दि. २७) पासून सुरू होत आहेत.

विद्यापीठाने ऑनलाईन, ऑफलाईन परीक्षांची तयारी पूर्ण केली आहे. २०० हून अधिक अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे ७१ हजार ६६७ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यात ४७ हजार ५६९ विद्यार्थी ऑनलाईन व २४ हजार ९८ विद्यार्थी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देणार आहेत. तीन सत्रांत सकाळी ११ ते १२, १.३० ते २.३०, ४ ते ५ यावेळेत परीक्षा घेतल्या जाणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात २९३ परीक्षा केंद्रे असून, **पान ८ वर** ▸

# विद्यापीठ अंतिम वर्ष परीक्षा आजपासून

(पान ३ वरून) प्रत्येक जिल्ह्यासाठी भरारी पथक नेमण्यात आले आहे. ऑनलाईन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या परीक्षार्थींना ई-मेल व एस.एम.एस.द्वारे यापूर्वी पाठविण्यात आलेले लॉगीन व पासवर्ड पूर्ण परीक्षेसाठी तेच कायम राहणार आहेत. ऑनलाईन पद्धतीने जे विद्यार्थी परीक्षा देणार आहेत, त्यांना कोणतीही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास शिक्षण घेत असलेल्या अधिविभागात, महाविद्यालयात ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देता येणार आहे. ऑफलाईन पद्धतीने परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश पत्र महाविद्यालयाच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून दिले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑफलाईन परीक्षेवेळी मास्क, सॅनिटायझरसह सर्व शासकीय नियमांचे पालन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश पत्र मिळाले नाहीत अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे ओळखपत्र किंवा इतर शासकीय ओळखपत्र पाहून परीक्षेस बसू द्यावे, असे महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सकाळी परीक्षा विभागाच्या आढावा बैठकीत परीक्षा संदर्भात सूचना दिल्या आहेत. परीक्षा व मूल्यमापन विभागाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

**...तर फेरपरीक्षा घेणार!**

विद्यापीठामार्फत मोबाईल सर्व्हिस प्रोव्हायडर कंपन्यांसह महावितरण कार्यालयास परीक्षा कालावधीत सेवा सुरळीत ठेवण्यासाठी पत्रे पाठविण्यात आली आहेत. परीक्षेवेळी नेटवर्क, वीजपुरवठा खंडित होणे, अचानक सर्व्हर डाऊन होणे, अशी अडचण उद्‌भवल्यास परीक्षार्थींनी गोंधळून जाऊ नये. परीक्षार्थींनी संबंधित महाविद्यालय, अधिविभाग यांच्या माध्यमातून परीक्षा विभागास कळविल्यास संबंधित विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा आयोजित करण्यात येणार आहे.

# विद्यापीठात आजपासून परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

---

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष, सत्रातील परीक्षांचा आज, मंगळवारपासून प्रारंभ होणार आहे. या परीक्षेसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील एकूण ७२७३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी ४८२५८ विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यासाठी ऑनलाईन पर्याय निवडला आहे. या परीक्षेवर सहा भरारी पथकांची नजर राहणार आहे.

# आजपासून अंतिम वर्षाच्या परीक्षा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातर्फे मंगळवार, दि. २७ पासून अंतिम वर्षाच्या परीक्षांना सुरुवात होत आहे. एकूण ७२ हजार विद्यार्थी ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने परीक्षेला सामोरे जात आहेत. या परीक्षांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने काटेकोर नियोजन केले आहे.

अंतिम वर्षासाठी परीक्षा ४७ हजार ५६९ विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने आणि २४ हजार ९८ ऑफलाईन पद्धतीने देणार आहेत. ऑनलाईन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या परीक्षार्थींना ईमेल व एसएमएसद्वारे यापूर्वी पाठवण्यात आले आहेत. सर्व परीक्षांची सुधारित वेळापत्रके विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहेत. परीक्षार्थींना संगणक प्रणालीद्वारे प्रवेशपत्रे उपलब्ध करण्यात देण्यात आली आहेत. प्रवेशपत्रावरील विषय परीक्षा, दिनांक व वेळ याची वेळापत्रकानुसार खात्री करून घ्यावी. तसेच ऑनलाईन पद्धतीने जे परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत त्यांना कोणतीही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास परीक्षार्थी शिक्षण घेत असलेल्या अधिविभागात आणि महाविद्यालयात ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देता येईल. यासाठी परीक्षेपूर्वी संबंधित परीक्षार्थींना आपल्या विभागाच्या विभागप्रमुख किंवा प्राचार्य यांच्याशी संपर्क साधावा.

विद्यापीठामार्फत मोबाईल सर्व्हिस प्रोव्हायडर कंपन्यांसह महावितरण कार्यालयास परीक्षा कालावधीत सेवा सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने पत्रे पाठवून विनंती करण्यात आलेली आहे. तरीही परीक्षेच्या संदर्भात नेटवर्क, वीजपुरवठा खंडित होणे अथवा अचानक सर्व्हर डाऊन होणे अशा प्रकारची कोणतीही अडचण उद्‌भवल्यास परीक्षार्थ्यांनी गोंधळून जाऊ नये अगर चिंताग्रस्त होऊ नये. या परीक्षार्थींने आपले महाविद्यालय तसेच अधिविभाग यांच्या माध्यमातून परीक्षा विभागास तसे अवगत केल्यास संबंधित परीक्षार्थ्यांची फेरपरीक्षा आयोजित करण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन विभागाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली आहे.

# अंतिम वर्षाच्या परीक्षा आजपासून

## तीन सत्रात परीक्षेचे नियोजन : ४८ हजार विद्यार्थी देणार ऑनलाईन परीक्षा

प्रतिनिधी
कोल्हापूर

तांत्रिक कारणास्तव तीन वेळा पुढे ढकलण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षातील शेवटच्या सत्राच्या परीक्षांना आज (मंगळवार) पासून प्रारंभ होत आहे. सुमारे ४८ हजार २५८ विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने तर २४ हजार ४७५ विद्यार्थी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देणार आहेत. परीक्षेची



संपूर्ण तयारी झाली असून विद्यार्थ्यांना त्यांच्या मेलवर हॉल तिकीट पाठविण्यात आले आहे.

विविध कारणांमुळे तीन वेळा परीक्षांच्या तारखा पुढे ढकलण्यात आल्या होत्या. आज (मंगळवार २७) पासून परीक्षांना प्रारंभ होत आहे. पहिल्याच दिवशी एम.बी.ए. एम.एस.डब्ल्यू. फार्मसी, बी. व्होक अशा चार अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. काहीही तांत्रिक अडचण आल्यास विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संपर्क साधावा. तसेच ज्या विद्यार्थ्यांना हॉल तिकीट मिळाले नाही, त्यांनी आधार कार्ड, पॅन कार्ड, कॉलेज आयकार्ड घेऊन जाण्याचे आवाहन केले आहे.







शिवाजी विद्यापीठ : १) संगीतशास्त्र विभागाशेजारील भरलेला तलाव. २) पाण्याने भरलेली विहीर.

# जलसंधारणातून उलगडले विद्यापीठाचे जलवैभव

## नैसर्गिक प्रवाह, ओढे यांची नोंद; भूगर्भातील साठाही वाढला

सकाळ वृत्तसेवा

**आर. के. नगर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठामध्ये केलेल्या जलसंधारणाच्या कामांमुळे विद्यापीठ जलयुक्त झाले. त्यामुळे आसपासच्या परिसरातील भूगर्भातील जलसाठाही वाढला. तसेच विद्यापीठाच्या आठशे एकर परिसरातील नैसर्गिक जलप्रवाह, ओढे, पाणथळ जागा यांची नोंद करण्यात आली. यामुळे विद्यापीठाचे जलवैभव समोर आले.**

> जलसंधारणाची कामे करताना जमिनीचा उंच-सखलपणा पाहिला जातो. त्यासाठी ट्रोपोग्राफिकल नकाशा बनवला होता. विद्यापीठात छोटे-मोठे जलप्रवाह आहेत. त्यातून पावसाळ्यात वाहणारे पाणी अडवून साठवले आहे. या जलप्रवाहांमुळे भूगर्भातील पाणीसाठाही वाढला आहे.
>
> – प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

विद्यापीठात जलसंधारणाची कामे गेल्या पाच वर्षांत मोठ्या प्रमाणात झाली. मात्र याच्या सुरुवातीला विद्यापीठाचा ट्रोपोग्राफिकल नकाशा बनवण्यात आला. यामुळे विद्यापीठाच्या विस्तीर्ण परिसरातील उंच-सखल भाग, ओढे, पावसाळ्यात वाहणारे नैसर्गिक जलप्रवाह यांची शास्त्रीय पद्धतीने नोंद झाली. विद्यापीठाचा परिसर हा उंच, सखल असल्याने येथे अनेक नैसर्गिक प्रवाह आहेत. जुन्या पुणे-बेंगलोर महामार्गाच्या बाजूने येणारे पावसाचे पाणी या मार्गाने पुढे राजेंद्रनगरकडून येणाऱ्या ओढ्याला मिळायचे; तर कुलगुरू निवास इमारत, मानव्यशास्त्र इमारत या बाजूचे सर्व पावसाचे पाणी पुढे प्रतिभानगरातून राजेंद्रनगर मार्गे येणाऱ्या ओढ्याला मिळायचे. विद्यापीठ परिसरातही दोन ओढे आहेत. याशिवाय सुमारे वीस जलप्रवाहही आहेत. विद्यापीठाच्या विस्तीर्ण परिसरातील जलसंधारणाच्या कामामुळे पावसाचे पाणी साठवले गेले. सध्या विद्यापीठात सुमारे ३० कोटी लिटर पाणी साठवले जाते. विद्यापीठातील जलप्रवाहातून वाहणारे पाणी तलाव आणि विहिरींमध्ये साठते. त्यासाठी जमिनीचा उतार पाहून चर मारले आहेत. पावसाळ्यात त्यातून खळाळणारे पाणी या परिसराची शोभाही वाढवते. जलसंधारणाच्या या कामामुळे सर्व जलप्रवाहांची नोंद शास्त्रीय पद्धतीने झाली. यामुळे या परिसरातील जैवविविधताही वाढली आहे.

### दृष्टिक्षेपात जलवैभव

| २० | ६ | १० | १० | २ |
|---|---|---|---|---|
| जलप्रवाह | ओढे | शेततळी | विहिरी | तलाव |

भूपृष्ठावरील पाणीसाठा : ३० कोटी लिटर